# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक १४/०१/२०१८

## पोलीस-नक्षल चकमकीत ठार झालेल्या जहाल पुरुष नक्षलवादयाची ओळख पटली

उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या ताडपल्ली जंगल परीसरात जलद प्रतिसाद दल, एटापल्ली चे जवान नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना दिनांक १०/०१/२०१८ रोजी दुपारी ०४.३० ते ०५.०० वा. च्या दरम्यान पोलीस नक्षल चकमक झाली होती. या चकमकीमध्ये एक जहाल पुरुष नक्षलवादी ठार झाला होता. सदर मृत पुरुष नक्षलवादयाची आज ओळख पटविण्यात आली असून सदर मृत पुरुष नक्षलवादयाचे नाव कमलेश ऊर्फ शामसिंग आग्नु होळी, वय- ४१ वर्ष, रा. कोसमी नं. ०१, ता. धानोरा, जि. गडचिरोली असे असून तो सध्या कसनसुर एलओएस मध्ये एरिया कमिटी मेंबर म्हणून कार्यरत होता. त्याच्यावर गडचिरोली जिल्हयातील पोस्टे, उपपोस्टे, पोमके मध्ये एकूण २५ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. तो २००२ सालापासून नक्षल म्हणून कार्यरत होता. पोटेगाव दलम, चातगाव दलम, कोरची दलम, चामोर्शी दलम यामध्ये त्याने सदस्य पदावर काम केले. २०१५-२०१६ मध्ये चामोर्शी दलम मधून त्याची बदली कसनसुर एलओएस मध्ये एरिया कमिटी मेंबर म्हणून झाली होती. त्याचेवर सरकार तर्फे ६ लाखांचे बक्षिस ठेवण्यात आले होते.